माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००७/२०१७-१८
दि.१९/०१/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.विलास महादेव सावंत,
शॉप नं.२, जनीभवन,
पोष्ट ऑफीस समोर, फाटक रोड,
भाईदर (प.) ४०११०१. ................अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
विधी अधिकारी (विधी) ................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.विलास महादेव सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी (विधी) यांचेकडे दि.०७/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे गोडदेव सर्व्हे क्र.३२३, जुना ३३ नविन, हिस्सा क्र.३ या जागेवरील अनधिकृत बंगल्याच्या मा.न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती बाबतची माहिती कागदपत्रांच्या सत्यप्रतसह मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत असमाधानकार माहिती दिल्याने अपिलार्थी यांनी दि.०९/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी (विधी) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०१/२०१८ रोजी दुपारी ०३.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.विधी/२०६/२०१८ दि.१५/०१/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी (विधी) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०७/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला असमाधानकारक माहिती दिलेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी (विधी) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत मुद्देनिहाय सुधारित माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.विलास महादेव सावंत,
शॉप नं.२, जनीभवन,
पोष्ट ऑफीस समोर, फाटक रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी (विधी)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी) यांचे कार्यालय.

पोच
23/1/18
लिपिक
मिरा-भाईंदर महानगरपालिका